॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 22 — DVAVIMSHATITAMODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Chapter 22 opens with King Uparichara Vasu comforting the grieving Kilotala—revealed in her celestial form as Mainakini—explaining that her earthly curse is now fulfilled and promising that in twelve years, during Indra's great yajna in Sinhaladvipa attended by the gods and the nine Naths, she will see Machindranath and the grown Meenanath again. After receiving his solemn pledge, Mainakini installs Dairbhama as ruler, bids farewell to her subjects, and ascends back to heaven with her father-in-law. Meanwhile, Machindranath, Gorakshanath, and young Meenanath journey toward Gaudabangala, pausing at the tree where Gorakshanath had first met Kanifnath; overwhelmed by memories, Gorakshanath recounts his suffering during Machindranath's captivity until his guru consoles him. Reaching Helapattan, they learn Kanifnath has already rescued Jalindarnath from Raja Gopichand's pit, initiated Gopichand, and crowned Muktachand, so they visit Gopichand's wise mother, Queen Mainavati, who honors them before they travel via Jagannath Puri to Saurashtra. There, disgusted after being sent to clean up young Meenanath, Gorakshanath decides to test his guru's detachment: he kills the boy at the river, feeds his flesh to the water creatures, and dries the skin in the sun, telling Machindranath the child was "washed and put out to dry." Devastated upon seeing the skin, Machindranath weeps bitterly until Gorakshanath reminds him that the true Self is immortal and revives Meenanath with the Sanjivani mantra. As they resume their journey, Machindranath reveals that his weeping was actually a counter-test to verify whether Gorakshanath himself had transcended worldly delusion, declaring his disciple's wisdom now complete as the poet Malu Narahari previews the next chapter.

Ovee 1

जयजयाजी कमळाकांता । कमळनाभा कमलोद्भवपिता । कमळपत्राक्षा दुःखहर्ता । पुढें ग्रंथ रसाळ बोलवीं ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Kamalaa-kaantaa | Kamala-naabhaa kamalodbhava-pitaa | Kamala-patra-akshaa duhkha-hartaa | Pudhe grantha rasaala bolavee ||

Ovee 2

भक्तिसारग्रंथ हा रत्न । बोलवीं श्रोत्यांकारण । मागिले अध्यायीं गोरक्षनंदन । मच्छिंद्र घेऊनि गेला असे ॥

Transliteration

Bhakti-saara-grantha haa ratnu | Bolavee shrotyaan-kaaranu | Maagile adhyaayee Goraksha-nandanu | Machchindra gheuni gelaa ase ||

Ovee 3

नेला तरी कीलोतळा । बुडालीसे शोकाब्धिजळा । ते उपरिचरवसु तरणिआगळा । काढावया पातला ॥

Transliteration

Nelaa taree Keelotalaa | Budaaleese shoka-abdhi-jalaa | Tey Uparichara-vasu tarani-aagalaa | Kaadhaavayaa paatalaa ||

Ovee 4

स्थावरबोधाची बांधूनि सांगडी । शोकाब्धींत घातली उडी । शब्दार्थी मारुनि बुडी । धैर्य कांसे धरियेले ॥

Transliteration

Sthaavara-bodhaachee baandhuni saangadee | Shoka-abdheenta ghaatalee udee | Shabda-arthee maaruni budee | Dhairya kaanse dhariyele ||

Ovee 5

धरिल्यावरी बाहेर काढुनि । म्हणे माय वो सावधानी । शोक सांडीं अशाश्वत गहनी । शाश्वत नाहीं कांहींच ॥

Transliteration

Dharilyaavaree baahera kaadhuni | Mhane Maaya vo saavadhaanee | Shoka saandee ashaashvata gahanee | Shaashvata naahee kaanheenchu ||

Ovee 6

पाहतेपणीं जें जें दृश्य । तें आभासपणीं पावे नाश । तूं शोक करिसी शब्दप्राप्तीस । श्लाघ्य तूंतें लागेना ॥

Transliteration

Paahatepanee je je drishyu | Tey aabhaasapanee paave naashu | Too shoka karisee shabda-praapteesu | Shlaaghya toote laagenaa ||

Ovee 7

तूं कोठील मच्छिंद्र कोण । स्वर्ग-भूमीचा झाला संगम । योग तितुका भोगकाम । करुनि गेला जननीये ॥

Transliteration

Too kotheela Machchindra konu | Svarga-bhoomeechaa jhaalaa sangamu | Yoga titukaa bhoga-kaamu | Karuni gelaa jananeeye ||

Ovee 8

तूं असशी स्वर्गवासिनी । मच्छिंद्र स्तविला जन्मोनी । परी प्रारब्धें सहजयोगेंकरुनी । गांठी पडली उभयतां ॥

Transliteration

Too asasee svarga-vaasinee | Machchindra stavilaa janmonee | Paree praarabdhe sahaja-yogenkarunee | Gaanthee padalee ubhayataa ||

Ovee 9

पडली परी मच्छिंद्रनाथ । स्मरोनि गेला आपुलें हित । तूं आपुलें स्वहित निश्चित । सांभाळीं कीं जननीये ॥

Transliteration

Padalee paree Machchindra-Naathu | Smaroni gelaa aapule hitu | Too aapule sva-hita nishchitu | Saambhaalee kee jananeeye ||

Ovee 10

तूं झालीस पदच्युत । तरी तें सांभाळीं निश्चित । तरी आतां मानूनि व्यक्त । होऊनि चाल जननीये ॥

Transliteration

Too jhaaleesa pada-chyutu | Taree tey saambhaalee nishchitu | Taree aataa maanuni vyaktu | Houni chaala jananeeye ||

Ovee 11

तूं पातलिया सिंहलद्वीप । मग मच्छिंद्रयोगें स्थावरकंदर्प । पूर्ण होईल शुद्धसंकल्प । मच्छिंद्र दृष्टीं पाहूनिया ॥

Transliteration

Too paataliyaa Sinhala-dveepu | Maga Machchindra-yoge sthaavara-kandarpu | Poorna hoeela shuddha-sankalpu | Machchindra drishtee pahuniyaa ||

Ovee 12

द्वादश वर्षे झालिया पूर्ण । तूंतें भेटवीन मच्छिंद्रनंदन । मीननाथादि तपोधन । गोरक्ष दृष्टीं पाहसील तूं ॥

Transliteration

Dvaadasha varshe jhaaliyaa poornu | Toote bhetaveena Machchindra-nandanu | Meena-naathaadi tapodhanu | Goraksha drishtee paahaseela too ||

Ovee 13

म्हणशील यावया मच्छिंद्रनंदन । काय पडेल त्या कारण । सिंहलद्वीपीं पाकशासन । महामख आरंभील ॥

Transliteration

Mhanasheela yaavayaa Machchindra-nandanu | Kaaya padela tyaa kaaranu | Sinhala-dveepee paaka-shaasanu | Mahaa-makha aarambheelu ||

Ovee 14

तेव्हां विष्णु विरिंची रुद्र । तया स्थानीं येती भद्र । सकळ देवादिक मित्र चंद्र । एका ठायीं मिळतील ॥

Transliteration

Tevhaa Vishnu Virinchee Rudru | Tayaa sthaanee yetee Bhadru | Sakala devaadika Mitra Chandru | Ekaa thaayee milateelu ||

Ovee 15

ते नवनाथादि प्रतापवंत । ऐक्य करील शचीनाथ । गहिनी गोपीचंद भर्तरीसहित । एका ठायीं मिळतील ॥

Transliteration

Tey Nava-naathaadi prataapa-vantu | Aikya kareela Shachee-naathu | Gahinee Gopeechanda Bhartaree-sahitu | Ekaa thaayee milateelu ||

Ovee 16

तरी आतां शोक कां व्यर्थ । सांडीं प्रांजळ करीं चित्त । विमानारुढ होऊनि त्वरित । सिंहलद्वीपीं चाल कीं ॥

Transliteration

Taree aataa shoka kaa vyarthu | Saandee praanjala karee chittu | Vimaana-arudha houni tvaritu | Sinhala-dveepee chaala kee ||

Ovee 17

ऐसें ऐकोनि मैनाकिनी । महाराजा श्वशुरप्राज्ञी । द्वादश वर्षें मच्छिंद्र नयनीं । दावीन ऐसें म्हणतसां ॥

Transliteration

Aise aikoni Mainaakinee | Mahaaraajaa shvashura-praajnyee | Dvaadasha varshe Machchindra nayanee | Daaveena aise mhanatasaa ||

Ovee 18

तरी मखमंडप पाकशासन । करो अथवा न करो पूर्ण । जरी मज दावाल मम नंदन । तरी मज भाष्य द्यावी की ॥

Transliteration

Taree makha-mandapa paaka-shaasanu | Karo athavaa na karo poornu | Jaree maja daavaala mama nandanu | Taree maja bhaashya dyaavee kee||

Ovee 19

भाष्य दिधल्या अंतरपुटीं । विश्वासरत्ना रक्षीन पोटीं । मग हे शोक दरिद्र पाठीं । चित्त सांडील महाराजा ॥

Transliteration

Bhaashya didhalyaa antara-putee | Vishvaasa-ratnaa raksheena potee | Maga hey shoka daridra paathee | Chitta saandeela Mahaaraajaa ||

Ovee 20

ऐसें बोलतां मैनाकिनी । श्वशुर हास्य करी आननीं । मग करतलभाष्य देऊनी । संतुष्ट केलें सुनेतें ॥

Transliteration

Aise bolataa Mainaakinee | Shvashura haasya karee aananee | Maga karatala-bhaashya deuunee | Santushta kele sunete ||

Ovee 21

यावरी बोले कीलोतळा मातें नेतां स्वर्गमंडळा । परी नृपपणीं या स्थळा । कोणालागीं स्थापावें ॥

Transliteration

Yavaree bole Keelotalaa maate netaa svarga-mandalaa | Paree nripapanee yaa sthalaa | Konaalaagee sthaapaave ||

Ovee 22

येरु म्हणे ऐक वचन । सवें सेवेसी आहेत क्रियावान । दैर्भामा उत्तम नामानें । राज्य तीतें ओपीं कां ॥

Transliteration

Yeru mhane aika vachanu | Save sevesee aaheta kriyaavaanu | Dairbhaamaa uttama naamaane | Raajya teete opee kaa ||

Ovee 23

मग अवश्य म्हणे मैनाकिनी । दैर्भामा राज्यासनीं । बैसविली अभिषेक करुनी । राज्यपदीं तेधवां ॥

Transliteration

Maga avashya mhane Mainaakinee | Dairbhaamaa raajya-aasanee | Baisavilee abhisheka karunee | Raajya-padee tedhavaa ||

Ovee 24

राज्यीं ओपूनि दैर्भामा । मिळती झाली विमानसंगमा । परी सकळ देशींच्या शैल्या रामा । शोकाकुळ झाल्या कीं ॥

Transliteration

Raajyee opuni Dairbhaamaa | Milatee jhaalee vimaana-sangamaa | Paree sakala desheenchyaa shailyaa Raamaa | Shoka-akula jhaalyaa kee ||

Ovee 25

म्हणती माय वो शुभाननी । तुम्ही जातां आम्हांसी टाकुनी । आम्हां पाडसांची हरिणी । दयाळ माय अससी तूं ॥

Transliteration

Mhanatee Maaya vo shubha-aananee | Tumhee jaataa aamhaansee taakunee | Aamhaa paadasaanchee harinee | Dayaala Maaya asasee too ||

Ovee 26

असो ऐशा बहुधा शक्ती । शैल्या शोकाकुलित होती । मग तितुक्यां समजावूनि युक्तीं । विमानयानीं आरुढली ॥

Transliteration

Aso aishaa bahudhaa shaktee | Shailyaa shoka-akulita hotee | Maga titukyaa samajaavuni yuktee | Vimaana-yaanee aarudhalee ||

Ovee 27

दैर्भामेसी नीतिप्रकार । सांगूनि युक्ती समग्र । यथा समान प्रजेचा भार । सांभाळीं कां साजणीये ॥

Transliteration

Dairbhaamesee neeti-prakaaru | Sanguni yuktee samagru | Yathaa samaana prajechaa bhaaru | Saambhaalee kaa saajaneeye ||

Ovee 28

जेथील तेथें हित फार । तैसें केलें गोचर । मग विमानीं आपण सश्वशुर । स्वर्गमार्गें गमताती ॥

Transliteration

Jetheela tethe hita phaaru | Taise kele gocharu | Maga vimaanee aapana sashvashuru | Svarga-maarge gamataatee ||

Ovee 29

असो विमान पावे द्वीपाप्रती । पदा स्थापिली ते युवती । मग तो उपरिचर सहजगती । आपुल्या स्थाना पैं गेला ॥

Transliteration

Aso vimaana paave dveepaa-pratee | Padaa sthaapilee tey yuvatee | Maga toh Uparichara sahaja-gatee | Aapulyaa sthaanaa pai gelaa ||

Ovee 30

जैसीं दिनखेळमेळें । चरुं जाती पक्षिकुळें । येरी होतां सायंकाळें । आपुल्या स्थाना सेविती ॥

Transliteration

Jaisee dina-khela-mele | Charu jaatee pakshi-kule | Yeree hotaa saayankaale | Aapulyaa sthaanaa sevitee ||

Ovee 31

त्याचि न्यायें उपरिदक्षें । आणिली कीलोतळा पद्मिनी प्रत्यक्ष । शापमोचन सायंकाळास । स्थाना पावली आपुल्या ॥

Transliteration

Tyaachi nyaaye upari-dakshe | Aanilee Keelotalaa Padminee pratyakshu | Shaapa-mochana saayankaalaasu | Sthaanaa paavalee aapulyaa ||

Ovee 32

कीं अब्धीचें अपार जीवन । व्यापी महीतें मेघमुखानें । परी तें पुन्हा सरिताओघानें । ठायींचे ठायीं जातसे ॥

Transliteration

Kee abdheeche apaara jeevanu | Vyaapee maheete megha-mukhaane | Paree tey punhaa saritaa-oghaane | Thaayeenche thaayee jaatase ||

Ovee 33

त्याचिया न्यायें स्नुषा श्वशुर । पावते झाले स्वस्थानावर । परी तैं इकडे नाथ मच्छिंद्र । गौडबंगालीं पातला ॥

Transliteration

Tyaachiyaa nyaaye snushaa shvashuru | Paavate jhaale sva-sthaanaa-varu | Paree tai ikade Naatha Machchindru | Gauda-Bangaalee paatalaa ||

Ovee 34

मिननाथ स्कंधीं वाहून । मार्गावरी करिती गमन । तों शैल्यदेशसीमा उल्लंघून । गौडबंगालीं पातले ॥

Transliteration

Meena-naatha skandhee vaahunu | Maargaavaree karitee gamanu | Toh shailya-desha-seemaa ullanghunu | Gauda-Bangaalee paatale ||

Ovee 35

मार्गी लागतां ग्राम कोणी । त्या ग्रामांत संचरोनी । गोरक्ष भिक्षा आणी मागुनी । उदरापुरती तिघांच्या ॥

Transliteration

Maargee laagataa graama konee | Tyaa graamaanta sancharonee | Goraksha bhikshaa aanee maagunee | Udaraa-pura-tee tighaanchyaa ||

Ovee 36

ऐसेपरी निर्वापण । मार्गी करिताती गमन । तों कौलबंगाला सांडून । गौडबंगाली पातले ॥

Transliteration

Aiseparee nirvaapanu | Maargee karitaa-tee gamanu | Toh Kaula-Bangaalaa sandunu | Gauda-Bangaalee paatale ||

Ovee 37

मार्गी चालतां सहजस्थितीं । तों कानिफा पूर्वी भेटला तयांप्रती । तेथें पातल्या त्रिवर्गमूर्ती । गमन करितां मार्गातें ॥

Transliteration

Maargee chaalataa sahaja-sthitee | Toh Kaaniphaa poorvee bhetalaa tayaam-pratee | Tethe paatalyaa trivarga-moortee | Gamana karitaa maargaate ||

Ovee 38

तेथें येतांचि गोरक्ष जेठी । स्मरण झालें तयांचे पोटीं । कीं अच्युतवृक्षापुटीं । कानिफाची भेटी झालीसे ॥

Transliteration

Tethe yetaanchi Goraksha jethee | Smarana jhaale tayaanche potee | Kee achyuta-vrikshaa-putee | Kaaniphaachee bhetee jhaaleese ||

Ovee 39

झाली परी हे उत्तम स्थान । महायशस्वी पुण्यवान । मातें दाविले श्रीगुरुचे चरण । जैसे चुकल्या वत्सासी ॥

Transliteration

Jhaalee paree hey uttama sthaanu | Mahaa-yashasvee punya-vaanu | Maate daavile Shree-guru-che-charanu | Jaise chukalyaa vatsaasee ||

Ovee 40

प्रत्यक्ष माझी मच्छिंद्रराणी । गेली होती आदिपट्टराणी । मी पाडस रानोरानीं । निढळ्यावाणी लागतसे ॥

Transliteration

Pratyaksha maajhee Machchindra-raanee | Gelee hotee aadi-patta-raanee | Mee paadasa raano-raanee | Nidhalyaavaanee laagatase ||

Ovee 41

कीं मज वत्सासी घौली । सहज रानीं चरावया गेली । शैल्या व्याघ्रें आव्हाटिली । ती भेटविली रायानें ॥

Transliteration

Kee maja vatsaasee ghaulee | Sahaja raanee charaavayaa gelee | Shailyaa vyaaghre aavhaatilee | Tee bhetavilee raayaane ||

Ovee 42

मग स्कंधीं होता नाथ मीन । तयालागीं महीं ठेवून । दृढ पायीं केलें नमन । नेत्रीं अश्रु लोटले ॥

Transliteration

Maga skandhee hotaa Naatha Meenu | Tayaa-laagee mahee thevunu | Dridha paayee kele namanu | Netree ashru lotale ||

Ovee 43

तें पाहूनि मच्छिंद्रनाथ । बोलता झाला गोरक्षातें । म्हणे बाळा अश्रुपात । निजचक्षूंसी कां आले ॥

Transliteration

Tey pahuni Machchindra-Naathu | Bolataa jhaalaa Gorakshaate | Mhane baalaa ashru-paatu | Nija-chakshoonsee kaa aale ||

Ovee 44

ऐसें बोलतां मच्छिंद्रनाथ । मग सकळ दुःखाचे मंडण । तें गोरक्षचित्ती प्रविष्ट होऊन । नेत्रीं नीर अपार लोटलें ॥

Transliteration

Aise bolataa Machchindra-Naathu | Maga sakala duhkhaache mandanu | Tey Goraksha-chittee pravishta hounu | Netree neera apaara lotale ||

Ovee 45

सांगूं जातां मुखानें । तो कंठ आलासे भरुन । मग क्षण एक तया स्थानीं बैसून । स्थिर चित्त पैं केले ॥

Transliteration

Saangoo jaataa mukhaane | Toh kantha aalaase bharunu | Maga kshana eka tayaa sthaanee baisunu | Sthira chitta pai kele ||

Ovee 46

जैसें आकाशीं अभ्र दाटतां । पुन्हां निर्मळ होय तत्त्वतां । तैसें दुःख मोह चिंता । टाकूनि निर्मळ पैं केलें ॥

Transliteration

Jaise aakaashee abhra daatataa | Punhaa nirmala hoya tattvataa | Taise duhkha moha chintaa | Taakuni nirmala pai kele ||

Ovee 47

मग बदरिकाश्रमापासूनि कथन । दुःखव्यावृत्ति अति गहन । कानिफाभेटीपर्यंत वदून । ठाव यशस्वी म्हणतसे ॥

Transliteration

Maga Badarika-ashramaa-paasuni kathanu | Duhkha-vyaavritti ati gahanu | Kaaniphaa-bhetee-paryanta vadunu | Thaava yashasvee mhanatase ||

Ovee 48

याचि ठायीं कानिफाभेटी । झाली मातें कृपाजेठी । तुमची शुद्धी तद्वागवटीं । येथेंचि लाधली महाराजा ॥

Transliteration

Yaachi thaayee Kaaniphaa-bhetee | Jhaalee maate kripaa-jethee | Tumachee shuddhee tad-vaagavatee | Yethenchi laadhalee Mahaaraajaa ||

Ovee 49

तरी हें स्थान पुण्यवान । तुमचे दाविले मज चरण । तरीं हें स्थान धनवंत पूर्ण । चुकलें धन मज दिधलें ॥

Transliteration

Taree hey sthaana punya-vaanu | Tumache daavile maja charanu | Taree hey sthaana dhana-vanta poornu | Chukale dhana maja didhale ||

Ovee 50

दुःखसरिते प्रवाहें वेष्टी । बुडतां वांचविलें देऊनि पृष्ठी । कीं दुःखव्याघ्राच्या आसडूनि होटीं । माये भेटी झाली असे ॥

Transliteration

Duhkha-sarite pravaahe veshtee | Budataa vaanchavile deuni prishthee | Kee duhkha-vyaaghraachyaa aasaduni hotee | Maaye bhetee jhaalee ase ||

Ovee 51

कीं तुमचा वियोग प्रळयानळ । तयांत मी पडलों होतों बाळ । परी जागा नोहे हा घन शीतळ । मातें झाला महाराजा ॥

Transliteration

Kee Tumachaa viyoga pralaya-analu | Tayaanta mee padalo hoto baalu | Paree jaagaa nohe haa ghana sheetalu | Maate jhaalaa Mahaaraajaa ||

Ovee 52

कीं तुमचा वियोगकृतांतपाश । लागला होता मम कंठास । परी जागा नोहे हा सुधारस । मज भेटला महाराजा ॥

Transliteration

Kee Tumachaa viyoga-kritaanta-paashu | Laagalaa hotaa mama kanthaasu | Paree jaagaa nohe haa sudhaa-rasu | Maja bhetalaa Mahaaraajaa ||

Ovee 53

ऐसें म्हणोनि वारंवार । नेत्रीं लोटती अश्रुपूर । परम कनवाळू नाथ मच्छिंद्र । हृदयीं धरी गोरक्षा ॥

Transliteration

Aise mhanoni vaaramvaaru | Netree lotatee ashru-pooru | Parama kanavaaloo Naatha Machchindru | Hridayee dharee Gorakshaa ||

Ovee 54

मुख कुरवाळूनि आपुले हस्तें । सच्छिष्याच अश्रु पुसीत । मनांत म्हणे हा भाग्यवंत । गुरुभक्त एकचि हा ॥

Transliteration

Mukha kuravaaluni aapule haste | Sach-chishyaacha ashru puseetu | Manaanta mhane haa bhaagya-vantu | Guru-bhakta ekachi haa ||

Ovee 55

मग गोरक्षाचें समाधान । करुनियां मच्छिंद्रनंदन । मग मीननाथा कडे घेऊन । उठ वत्सा म्हणतसे ॥

Transliteration

Maga Gorakshaache samaadhaanu | Karuniyaa Machchindra-nandanu | Maga Meena-Naathaa kade gheunu | Utha vatsaa mhanatase ||

Ovee 56

पुढें मार्गीं करितां गमन । जालिंदराचें वर्तमान । सांगता झाला गोरक्षनंदन । श्रीमच्छिंद्राकारणें ॥

Transliteration

Pudhe maargee karitaa gamanu | Jaalindaraache vartamaanu | Saangataa jhaalaa Goraksha-nandanu | Shree-Machchindraa-kaarane ||

Ovee 57

गौडबंगाल हेलापट्टण । तुमचा गुरु जालिंदर पूर्ण । नाथपंथी हा अनुग्रहकारण । श्रीदत्ताचा मिरवतसे ॥

Transliteration

Gauda-Bangaala Helaa-pattanu | Tumachaa guru Jaalindara poornu | Naatha-panthee haa anugraha-kaaranu | Shree-Datta-achaa miravatase ||

Ovee 58

तो महाराज योगभ्रष्ट । पावला आहें महाकष्ट । गोपीचंदें करुनि अनिष्ट । महागर्ती घातला ॥

Transliteration

Toh Mahaaraaja yoga-bhrashtu | Paavalaa aahe mahaa-kashtu | Gopeechande karuni anishtu | Mahaa-gartee ghaatalaa ||

Ovee 59

मुळापासूनि सकल कथन । मच्छिंद्रा केलें निवेदन । परी नाथ मच्छिंद्र तें ऐकून । चित्तीं परम क्षोभला ॥

Transliteration

Mulaa-pasuni sakala kathanu | Machchindraa kele nivedanu | Paree Naatha Machchindra tey aikunu | Chittee parama kshobhalaa ||

Ovee 60

म्हणे ऐसा राजा आहे नष्ट । तरी आतां करीन त्याचें तळपट । नगरी पालथी घालीन सुघट । महीपालथा मिरवीन तो ॥

Transliteration

Mhane aisaa raajaa aahe nashtu | Taree aataa kareena tyaache talapatu | Nagaree paalathee ghaaleena sughatu | Mahee-paalathaa miraveena toh ||

Ovee 61

ऐसें बोलोनि विक्षेप चित्तीं । पुढें मागें परमगतीं । एकदोन मुक्काम साधिती क्षितीं । हेलापट्टणीं पातले ॥

Transliteration

Aise boloni vikshepa chittee | Pudhe maage parama-gatee | Eka-dona mukkaama saadhitee kshitee | Helaa-pattanee paatale ||

Ovee 62

ग्रामानिकट ग्रामस्त भेटती । त्यांतें वृत्तांत विचारीत जाती । ते म्हणती कानिफा येऊनि क्षितीं । मुक्त केलें जालिंदरा ॥

Transliteration

Graama-nikata graamasta bhetatee | Tyaante vrittaanta vichaareeta jaatee | Tey mhanatee Kaaniphaa yeuni kshitee | Mukta kele Jaalindaraa ||

Ovee 63

राया गोपीचंदा अनुग्रह देऊनि । जगीं मिरवला अमरपणीं । तेणें गुरुदीक्षा घेऊनि । तपालागीं तो गेला ॥

Transliteration

Raayaa Gopeechandaa anugraha deuni | Jagee miravalaa amara-panee | Tene guru-deekshaa gheuni | Tapaa-laagee toh gelaa ||

Ovee 64

राया मुक्तचंदा स्थापून । राज्यपदीं राज्यासन । देऊनियां अभिनंदन । तोही गेला षण्मास ॥

Transliteration

Raayaa Muktachandaa sthaapunu | Raajya-padee raajya-aasanu | Deuniyaa abhinandanu | Tohee gelaa shan-maasu ||

Ovee 65

सकळ कथामुळहूनी । मच्छिंद्रासी सांगितली ग्रामस्थानीं । तें मच्छिंद्राचे पडतां श्रवणीं । शांतपणीं मिरवला ॥

Transliteration

Sakala kathaa-mulahuunee | Machchindraasee saangitalee graama-sthaanee | Tey Machchindraache padataa shravanee | Shaanta-panee miravalaa ||

Ovee 66

जैसी प्रळयानळावरती । घनवृष्टीची होय व्यक्ती । मग सकळा उबाळा पाहूनि अती । अदृश्य होय पावक तो ॥

Transliteration

Jaisee pralayaanalaa-varatee | Ghana-vrishtee-chee hoya vyaktee | Maga sakalaa ubaalaa pahuni atee | Adrishya hoya paavaka toh ||

Ovee 67

कीं साधक पातला असतां । कीं श्रीगुरुंचा संसर्ग होतां । होतांचि सिद्धकाची व्यथा । नासूनि जाय ते क्षणीं ॥

Transliteration

Kee saadhaka paatalaa asataa | Kee Shree-gurunchaa sansarga hotaa | Hotaanchi siddha-kaa-chee vyathaa | Naasuni jaaya tey kshanee ||

Ovee 68

कीं तम ढिसाळ दाटल्या अवनीं । उदय होताचि वासरमणी । मग सकळ तम नाश पावूनी । दिशा मिरविती उजळल्या ॥

Transliteration

Kee tama dhisaala daatalyaa avanee | Udaya hotaachi vaasara-manee | Maga sakala tama naasha paavuunee | Dishaa miravitee ujalalyaa ||

Ovee 69

तन्न्यायें मच्छिंद्रसंताप । ग्रामस्त बोलतां झाला लोप । शांति वरुनि मोहकंदर्प । चित्तामाजी द्रवलासे ॥

Transliteration

Tan-nyaaye Machchindra-santaapu | Graamasta bolataa jhaalaa lopu | Shaanti varuni moha-kandarpu | Chittaa-maajee dravalaase ||

Ovee 70

यावरी तो मच्छिंद्रनंदन । ग्रामस्थां विचारी मुख्यत्वेंकरुन । अधिकारी राज्यनिपुण । कोण आहे प्राज्ञिक तेथें ॥

Transliteration

Yavaree toh Machchindra-nandanu | Graamasthaa vichaaree mukhyatven-karunu | Adhikaaree raajya-nipunu | Kona aahe praajnyika tethe ||

Ovee 71

येरी म्हणती योगद्रुमा । श्रेष्ठ करणिका राजउगमा । मैनावती शुभानना । प्राज्ञिकवंत मिरवतसे ॥

Transliteration

Yeree mhanatee Yoga-drumaa | Shreshtha karanikaa raaja-ugamaa | Mainaavatee shubha-aananaa | Praajnyi-ka-vanta miravatase ||

Ovee 72

त्या मातेनें अर्थ धरुन । पुत्र मिरवला जी अमरपणें । तुष्ट करोनि जालिंदरमन । अमर झाली आपणही ॥

Transliteration

Tyaa maatene artha dharunu | Putra miravalaa jee amara-pane | Tushta karoni Jaalindara-manu | Amara jhaalee aapanahee ||

Ovee 73

ऐसें बोलतां ग्रामस्थ युक्तीं । मनांत म्हणे मच्छिंद्र यती । ऐसी प्राज्ञिक आहे सती । भेटी घ्यावी तियेची ॥

Transliteration

Aise bolataa graamastha yuktee | Manaanta mhane Machchindra yatee | Aisee praajnyika aahe satee | Bhetee ghyaavee tiyechee ||

Ovee 74

ऐसिये धृती चित्तीं कल्पून । चालते झाले त्रिवर्गजन । ग्रामद्वारा शीघ्र येऊन । द्वाररक्षकां सांगती ॥

Transliteration

Aisiye dhritee chittee kalpunu | Chaalate jhaale trivarga-janu | Graama-dvaaraa sheeghra yeunu | Dvaara-rakshakaa saangatee ||

Ovee 75

म्हणती जालिंदर जो प्रज्ञावंत । तयाचा सहोदर मच्छिंद्रनाथ । ग्रामद्वारीं आहे तिष्ठत । जाऊनि सांगा सतीसी ॥

Transliteration

Mhanatee Jaalindara jo prajnyaa-vantu | Tayaachaa sahodara Machchindra-Naathu | Graama-dvaaree aahe tishthatu | Jauni saangaa sateesee ||

Ovee 76

अहो अहो द्वारपाळ । सांगा चला उतावेळ । मैनावती लक्षूनि सकळ । वृत्तांत तियेतें निवेदावा ॥

Transliteration

Aho aho dvaara-paalu | Saangaa chalaa utaavelu | Mainaavatee lakshuni sakalu | Vrittaanta tiyete nivedaavaa ||

Ovee 77

ऐसें द्वारपाळ ऐकून । मच्छिंद्रा करिते झाले नमन । म्हणती महाराजा आज्ञा प्रमाण । श्रुत करुं सतीसी ॥

Transliteration

Aise dvaara-paala aikunu | Machchindraa karite jhaale namanu | Mhanatee Mahaaraajaa aajnyaa pramaanu | Shruta karu sateesee ||

Ovee 78

म्हणती महाराजा मच्छिंद्रजती । जालिंदरसहोदर म्हणवितो क्षितीं । तो येवोनि ग्रामद्वाराप्रती । तिष्ठत आहे महाराजा ॥

Transliteration

Mhanatee Mahaaraajaa Machchindra-jatee | Jaalindara-sahodara mhanavito kshitee | Toh yevoni graama-dvaaraa-pratee | Tishthata aahe Mahaaraajaa ||

Ovee 79

ऐसें ऐकूनि मैनावती । म्हणे कैसी वृत्ती कैसी स्थिती । कैसी आहे भूषणव्यक्ति । अभ्यासानभ्यास दक्षतें ॥

Transliteration

Aise aikuni Mainaavatee | Mhane kaisee vrittee kaisee sthitee | Kaisee aahe bhooshana-vyakti | Abhyaasa-anabhyaasa dakshaate ||

Ovee 80

येरी म्हणे जी महाराजा । कनककांती तेजःपुंजा । बालार्ककिरणीं विजयध्वजा । आम्हांलागीं दिसतसे ॥

Transliteration

Yeree mhane jee Mahaaraajaa | Kanaka-kaantee tejah-punjaa | Baala-Arka-kiranee vijaya-dhvajaa | Aamhaa-laagee disatase ||

Ovee 81

माय वो आम्हां दिसतो ऐसा । कीं न पावला योनिसंभवसा । अवतारदीक्षे स्वर्गवासा । करील जनां वाटतसे ॥

Transliteration

Maaya vo aamhaa disato aisaa | Kee na paavalaa yoni-sambhavasaa | Avataara-deekshe svarga-vaasaa | Kareela janaa vaatatase ||

Ovee 82

शैली कंथा लेवूनि भूषण । सिंगी सारंगी समागम । कुबडी फावडी करीं कवळून । उभा द्वारी असे तो ॥

Transliteration

Shailee kanthaa levuni bhooshanu | Singee saarangee samaagamu | Kubadee phaavadee karee kavalunu | Ubhaa dvaaree ase toh ||

Ovee 83

आणिक एक सच्छिष्य त्यासी । संग्रहीं आहे सुखसेवेसी । परी तो शिष्य समान अभ्यासी । आम्हांलागीं भासतसे ॥

Transliteration

Aanika eka sach-chishya tyaasee | Sangrahee aahe sukha-sevesee | Paree toh shishya samaana abhyaasee | Aamhaa-laagee bhaasatase ||

Ovee 84

धृति वृत्ति दिक्षेलागुन । ज्ञानवैराग्यस्वरुपवान । आम्हांलागीं समसमान । गुरुशिष्य वाटती ॥

Transliteration

Dhriti vritti dikshe-laagunu | Jnyaana-vairaagya-sva-rupa-vaanu | Aamhaa-laagee sama-samaanu | Guru-shishya vaatatee ||

Ovee 85

त्याचि रितीं स्वरुप अपार । तान्हुलें एक असे किशोर । परी त्रिवर्ग स्वरुपसागर । नक्षत्रमणी भासती ॥

Transliteration

Tyaachi ritee svarupa apaaru | Taanhule eka ase kishoru | Paree trivarga sva-rupa-saagaru | Nakshatra-manee bhaasatee ||

Ovee 86

ऐसें सांगता द्वाररक्षक । मंत्री पाचारिला प्रत्योदक । मग स्वयें घेऊनि सुखासन कटक । सामोरी जातसे युवती ते ॥

Transliteration

Aise saangataa dvaara-rakshaku | Mantree paachaarilaa pratyodaku | Maga svaye gheuni sukha-aasana kataku | Saamoree jaatase yuvatee tey ||

Ovee 87

कतकासवें द्वारी येऊन । वंदिती झाली मच्छिंद्रनंदन । मग त्रिवर्गातें सुखासन । ओपून नेतसे मंदिरा ॥

Transliteration

Katakaasave dvaaree yeunu | Vanditee jhaalee Machchindra-nandanu | Maga trivargaate sukha-aasanu | Opuna netase mandiraa ||

Ovee 88

नेताचि मंदिरा राजभवनीं । भावें बैसविला कनकासनीं । षोडशोपचारें पूजूनि मुनी । नम्रवाणी गौरविलें ॥

Transliteration

Netaachi mandiraa raaja-bhavanee | Bhaave baisavilaa kanaka-aasanee | Shodasha-upachaare poojuni Munee | Namra-vaanee gauravile ||

Ovee 89

हे महाराजा तपःसविता । कोणाकडून येणें झालें आतां । आम्हां आळशावरी सरितां । प्रेमांबु लोटतसे ॥

Transliteration

Hey Mahaaraajaa tapah-savitaa | Konaa-kaduna yene jhaale aataa | Aamhaa aalashaavaree saritaa | Prema-ambu lotatase ||

Ovee 90

कीं दरिद्र्याचे द्रव्यहरण । करुं मांदुस धांवली आपण । कीं चित्ता बोधी अंतःकरण । बुडतां धांवे चिंतामणि ॥

Transliteration

Kee daridryaache dravya-haranu | Karu maandusa dhaavalee aapanu | Kee chittaa bodhee antah-karanu | Budataa dhaave chintaa-mani ||

Ovee 91

कीं मृत्युसमयीं हस्तपादास । ओढितां परम दुःखक्लेशास । तें पाहूनियां अमरपीयूष । धांव घेत कृपेनें ॥

Transliteration

Kee mrityu-samayee hasta-paadaasu | Odhitaa parama duhkha-kleshaasu | Tey pahuniyaa amara-peeyooshu | Dhaava gheta kripene ||

Ovee 92

कीं तृषासंकटीं प्राण । तों गंगाओघ आला धांवून । कीं क्षुधे पेटला जठराग्नू । पयोब्धि तों पातला ॥

Transliteration

Kee trishaa-sankatee praanu | Toh Gangaa-ogha aalaa dhaavunu | Kee kshudhe petalaa jatharaagnu | Payobdhi toh paatalaa ||

Ovee 93

तन्न्यायें अभाग्यभागीं । येथें पातलेत तुम्ही जोगी । परी कोणाच्या वचनप्रसंगीं । आम्हां दर्शवावा महाराजा ॥

Transliteration

Tan-nyaaye abhaagya-bhaagee | Yethe paataleta Tumhee jogee | Paree konaachyaa vachana-prasangee | Aamhaa darshavaa Mahaaraajaa ||

Ovee 94

येरी म्हणे वो माते ऐक । उपरीचरवसु माझा जनक । मच्छदेही देहादिक । आम्हांलागीं मिरवतसे ॥

Transliteration

Yeree mhane vo maate aiku | Upareechara-vasu maajhaa janaku | Machcha-dehee dehaadiku | Aamhaa-laagee miravatase ||

Ovee 95

यापरी श्रीगुरुज्ञानदृष्टी । तो अनसूयासुत शुक्तिकेपोटीं । तेणें कवळूनि मौळी मुष्टीं । वरदपात्रीं मिरवला ॥

Transliteration

Yaaparee Shree-guru-jnyaana-drishtee | Toh Anasoo-yaa-suta shuktike-potee | Tene kavaluni maulee mushtee | Varada-paatree miravalaa ||

Ovee 96

मज अनुग्रह प्राप्त झाला । त्यावरी श्रीजालिंदराला । प्राप्त होऊनि वैराग्याला । भूषवीतसे जननीये ॥

Transliteration

Maja anugraha praapta jhaalaa | Tyaa-varee Shree-Jaalindaraalaa | Praapta houni vairaagyaalaa | Bhooshaveetase jananeeyu ||

Ovee 97

धाकुटा बंधु गुरुभक्त । मज विराजला जालिंदरनाथ । परी या ग्रामी पापी अवस्थेंत । पावला हें ऐकिलें ॥

Transliteration

Dhaakutaa bandhu guru-bhaktu | Maja viraajalaa Jaalindara-Naathu | Paree yaa graamee paapee avasthentu | Paavalaa hey aikile ||

Ovee 98

म्हणूनि उग्रता धरुनि पोटीं । लंघीत आलों महीपाठीं । परी उत्तम संग्रह ग्रामजेठी । समस्तांनीं सांगीतलें ॥

Transliteration

Mhanuni ugrataa dharuni potee | Langheeta aalo mahee-paathee | Paree uttama sangraha graama-jethee | Samastaannee saangeetale ||

Ovee 99

तेणेंकरुनि कोपकंदर्प । झाला जननीं सर्व लोप । तरी तूं धन्य ज्ञानदीप । महीवरी असशी वो ॥

Transliteration

Tene-karuni kopa-kandarpu | Jhaalaa jananee sarva lopu | Taree too dhanya jnyaana-deepu | Mahee-varee asasee vo ||

Ovee 100

आपुल्या हितासी गृहीं आणून । शेवटीं परम प्रज्ञेकरुन । तुवां मिळविला स्वानंदघन । धन्य धन्य असशी तूं ॥

Transliteration

Aapulyaa hitaasee grihee anunu | Shevatee parama prajnye-karunu | Tuvaa milavilaa svaananda-ghanu | Dhanya dhanya asasee too ||

Ovee 101

धन्य धन्य मही ऐक । निवटूनि पूर्वजपातक दोंदिक । सनाथपणाची घेऊनि भीक । स्वर्गवासा मिरविशी ॥

Transliteration

Dhanya dhanya mahee aiku | Nivatuni poorva-ja-paataka dondiku | Sanaatha-panaachee gheuni bheeku | Svarga-vaasaa miravishee ||

Ovee 102

तरी तारक लोकां बेचाळिसां । कुळा झालीस भावाब्धिरसा । कीं भगीरथभूष पितृउद्देशा । मिरवलासे त्रिभुवनीं ॥

Transliteration

Taree taaraka lokaa bechaalisaa | Kulaa jhaaleesa bhaava-abdhi-rasaa | Kee Bhageeratha-bhoosha pitru-uddeshaa | Miravalaase tri-bhuvanee ||

Ovee 103

कीं विनतेचें दास्यपण । गरुडें साठविलें पीयूष देऊन । तेवीं तूं कुळांत सकळांकारण । तारक झालीस सर्वकाळीं ॥

Transliteration

Kee Vinateche daasyapanu | Garude saathavile peeyoosha deunu | Tevee too kulaanta sakalaan-kaaranu | Taaraka jhaaleesa sarva-kaalee ||

Ovee 104

ऐसें नाथ बोलतां युक्तीं । चरणीं माथा ठेवी सती । म्हणे महाराजा कृपामूर्ती । सदैव केलें तुम्हींच ॥

Transliteration

Aise Naatha bolataa yuktee | Charanee maathaa thevee satee | Mhane Mahaaraajaa kripaa-moortee | Sadaiva kele Tumheenchu ||

Ovee 105

तुमच्या दृष्टीचा सहज झळकू । कृपापात्र वरिला मशकू । मम प्रज्ञे मोहशठकू । मिरवला हे महाराजा ॥

Transliteration

Tumachyaa drishteechaa sahaja jhalakoo | Kripaa-paatra varilaa mashakoo | Mama prajnye moha-shathakoo | Miravalaa hey Mahaaraajaa ||

Ovee 106

अहा तुमचे पडिपाडें । न येती कल्पतरु झाडें । परि वासनेसमान कोडें । बरें वाईट मिरवतसे ॥

Transliteration

Ahaa Tumache padipaade | Na yetee Kalpataru jhaade | Pari vaasane-samaana kode | Bare vaaeta miravatase ||

Ovee 107

तैसी तुमची नव्हे स्थिती । साधक कल्याण मिरवी मती । कीं परीस देतां समानगती । बरें वाईट मिरवतसे ॥

Transliteration

Taisee Tumachee navhe sthitee | Saadhaka kalyaana miravee matee | Kee pareesa detaa samaana-gatee | Bare vaaeta miravatase ||

Ovee 108

परीस लोहाचें करी कनक । परी स्वदीक्षेची न तुटे भीक । तेवीं तुम्ही नोहेत साधक । आपुलेसमान करितां कीं ॥

Transliteration

Pareesa lohaache karee kanaku | Paree sva-deekshechee na tute bheeku | Tevee Tumhee noheta saadhaku | Aapule-samaana karitaa kee ||

Ovee 109

ऐशी उद्धारपूर्ण कोटी । तुम्ही मिरवितां महीपाठीं । उदार तरी समता होटीं । मेघ अपूर वाटतसे ॥

Transliteration

Aishee uddhaara-poorna kotee | Tumhee miravitaa mahee-paathee | Udaara taree samataa hotee | Megha apoora vaatatase ||

Ovee 110

मेघ उदार म्हणती लोक । परी तो अपूर ओसरे उदक । तस्मात् तुमचें औदार्य दोंदिक । समतापदासी मिरवेना ॥

Transliteration

Megha udaara mhanatee loku | Paree toh apoora osare udaku | Tasmaatu Tumache audaarya dondiku | Samataa-padaasee miravenaa ||

Ovee 111

तरी तुमची वर्णितां स्तुती । अपूर्ण असे माझी मती । ऐसें म्हणोनि मैनावती । चरणीं माथा ठेवीतसे ॥

Transliteration

Taree Tumachee varnitaa stutee | Apoorna ase maajhee matee | Aise mhanoni Mainaavatee | Charanee maathaa theveetase ||

Ovee 112

मग आसन वसन भूषणासहित । अन्नपानादि अन्य पदार्थ । सिद्ध करुनि मनोरथ । तुष्ट करीत नाथासी ॥

Transliteration

Maga aasana vasana bhooshanaa-sahitu | Anna-paanaadi anya padaarthu | Siddha karuni mano-rathu | Tushta kareeta Naathaasee ||

Ovee 113

तीन रात्री वस्ती करुन । सर्वां आशीर्वाद देऊन । मग निघता झाला मच्छिंद्रनंदन । गोरक्षानाथादिकरुनियां ॥

Transliteration

Teena raatree vastee karunu | Sarvaa aasheervaada deunu | Maga nighataa jhaalaa Machchindra-nandanu | Gorakshaa-Naathaa-di-karuniyaa ||

Ovee 114

सकळ कटकासहित । बोळवों निघाला चंद्रमुक्त । मैनावती आणि ग्रामस्थ । एक कोस बोळविती ॥

Transliteration

Sakala katakaa-sahitu | Balavo nighaalaa Chandra-muktu | Mainaavatee aani graamasthu | Eka kosa bolavitee ||

Ovee 115

सकळीं चरणावरीं ठेवून माथा । परतते झाले बोळवोनि नाथा । मग आपुले सदनीं येऊनीं तत्त्वतां । धन्य नाथ म्हणतात ॥

Transliteration

Sakalee charanaa-varee thevuni maathaa | Paratate jhaale bolavoni Naathaa | Maga aapule sadanee yeuunee tattvataa | Dhanya Naatha mhanataatu ||

Ovee 116

येरीकडे मच्छिंद्रनाथ । त्रिवर्गादि गमन करीत । ग्रामोग्राम मुक्काम साधीत । जगन्नाथीं पातलें ॥

Transliteration

Yereekade Machchindra-Naathu | Trivargaadi gamana kareetu | Graamo-graama mukkaama saadheetu | Jagannaathee paatale ||

Ovee 117

तेथें करुनि उदधिस्नान । जगन्नाथाचें घेऊनि दर्शन । तीन रात्रीं तेथें राहून । तीर्थविधी सारिला तो ॥

Transliteration

Tethe karuni udadhi-snaanu | Jagannaathaache gheuni darshanu | Teena raatree tethe rahunu | Teertha-Vidhee saarilaa toh ||

Ovee 118

तेथूनि निघोनि पुनः मार्गी । गमन करीत मग योगी । तों सौराष्ट्रग्राम मुक्काम प्रसंगीं । जाऊनि तेथें राहिले ॥

Transliteration

Tethuni nighoni punah maargee | Gamana kareeta maga yogee | Toh Sauraashtra-graama mukkaama prasangee | Jauni tethe raahile ||

Ovee 119

रात्र क्रमोनि जैसी तैसी । दुसरे दिनीं मित्रोदयासी । गोरक्ष सांवरोनि भिक्षाझोळीसी । भिक्षालागीं प्रवर्तला ॥

Transliteration

Raatra kramoni jaisee taisee | Dusare dinee mitrodayaasee | Goraksha saavaroni bhikshaa-jholasee | Bhikshaa-laagee pravartalaa ||

Ovee 120

भिक्षा मागोनि सदनोसदनीं । परम श्रमोनि आला सदनीं । तों येरीकडे शिबिरस्थानीं । शयनीं असे मीननाथ ॥

Transliteration

Bhikshaa maagoni sadano-sadanee | Parama shramoni aalaa sadanee | Toh yereekade shibira-sthaanee | Shayanee ase Meena-Naathu ||

Ovee 121

तो मच्छिंद्रनाथानें उठवोन । बैसविला शौचाकारण । तों तें संधींत भिक्षा मागोन । गोरक्षनाथ पातला ॥

Transliteration

Toh Machchindra-Naathaane uthavonu | Baisavilaa shauchaa-kaaranu | Toh tey sandheenta bhikshaa maagonu | Goraksha-Naatha paatalaa ||

Ovee 122

ग्रामांत हिंडतां सदनोसदनीं । श्रमें विटलासे मनीं । तो येतांचि स्थानीं श्रमोनी । मच्छिंद्रनाथ बोलतसे ॥

Transliteration

Graamaanta hindataa sadano-sadanee | Shrame vitalaase manee | Toh yetaanchi sthaanee shramonee | Machchindra-Naatha bolatase ||

Ovee 123

म्हणे गोरक्ष मीननाथ । शौचासी बैसविला आहे गल्लींत । तरी तूं त्यातें प्रक्षाळूनि त्वरित । घेऊनि येईं पाडसा ॥

Transliteration

Mhane Goraksha Meena-Naathu | Shauchaasa baisavilaa aahe galleentu | Taree too tyaate prakshaaluni tvaritu | Gheuni yeee paadasaa ||

Ovee 124

ऐसें बोलतां मच्छिंद्रनाथ । भिक्षाझोळी ठेवूनि तेथ । लक्षूनि पातला मीननाथ । गल्लीमाजी जाऊनियां ॥

Transliteration

Aise bolataa Machchindra-Naathu | Bhikshaa-jholee thevuni tethu | Lakshuni paatalaa Meena-Naathu | Gallee-maajee jauniyaa ||

Ovee 125

तो मीननाथ परम अज्ञान । हस्तपाद भरले विष्ठेनें । अंगव्यक्त गोरक्ष विष्ठा पाहोन । परम चित्तीं विटलासे ॥

Transliteration

Toh Meena-Naatha parama ajnyaanu | Hasta-paada bharale vishthene | Anga-vyakta Goraksha vishthaa paahonu | Parama chittee vitalaase ||

Ovee 126

मनांत म्हणे मच्छिंद्रासी । कीं परम असे विवसी । विषयउपद्रव संन्याशासी । व्यर्थ कासया पाहिजे ॥

Transliteration

Manaanta mhane Machchindraasee | Kee parama ase vivasee | Vishaya-upadrava sannyaashaasee | Vyartha kaasayaa paahije ||

Ovee 127

कीं कबरीभाराविण बोडकी । कुंकूं खटाटोप हुडकी । तेवीं मच्छिंद्रमनीं उपद्रव शेखीं । काय आज सुचला हो ॥

Transliteration

Kee kabaree-bhaaraa-vina bodakee | Kunkoo khataatopa hudakee | Tevee Machchindra-manee upadrava shekhee | Kaaya aaja suchalaa ho ||

Ovee 128

जन्मांधासी अवनीं । तोचि संभार रक्षी कानीं । निगडी मनुष्या षड्रसान्नीं । खटाटोप कासया ॥

Transliteration

Janma-andhaasee avanee | Tochi sambhaara rakshee kaanee | Nigadee manushyaa shad-rasaannee | Khataatopa kaasayaa ||

Ovee 129

कीं परम भ्याड सोडी सदन । शस्त्रसंभारापरी संगोपन । ज्याचें काय आसन वसन । त्या वस्त्रभूषण कासया ॥

Transliteration

Kee parama bhyaada sodee sadanu | Shastra-sambhaaraa-paree sangopanu | Jyaache kaaya aasana vasanu | Tyaa vastra-bhooshana kaasayaa ||

Ovee 130

कीं रानींचें रानसावज उन्मत्त । द्रव्य देऊनि त्या करावें शांत । तेवीं निःस्पृहताविषय अत्यंत । गोड कांहींच वाटेना ॥

Transliteration

Kee raaneenche raana-saavaja unmattu | Dravya deuni tyaa karaave shaantu | Tevee nihsprihataa-vishaya atyantu | Goda kanheencha vaatenaa ||

Ovee 131

ऐसें बोलुनि गौरनंदन । मीननाथातें करी कवळून । दृष्ट करी मच्छिंद्राकारणें । उचलोनियां तेधवां ॥

Transliteration

Aise boluni Gaura-nandanu | Meena-naathaate karee kavalunu | Drishta karee Machchindraa-kaarane | Uchaloniyaa tedhavaa ||

Ovee 132

विष्ठेव्यक्त मीननाथ । पाहोनि मच्छिंद्र बोलत । म्हणे गोरक्षा सरितेआंत । धुवोनि आणीं बाळका ॥

Transliteration

Vishthe-vyakta Meena-Naathu | Paahoni Machchindra bolatu | Mhane Gorakshaa sarite-aatu | Dhuvoni aanee baalakaa ||

Ovee 133

अवश्य म्हणोनि गोरक्षनाथ । तैसाचि उठोनि सरिते जात । संचार करितां सरितेंत । तो उत्तम दगड देखिला ॥

Transliteration

Avashya mhanoni Goraksha-Naathu | Taisaachi uthoni sarite jaatu | Sanchaara karitaa saritetu | Toh uttama dagada dekhilaa ||

Ovee 134

देखिलें परी एकांतस्थान । मनांत म्हणे न्यावें धुवोन । परी अंतर्बाह्य मळी निवटवून । नाथालागीं दाखवूं ॥

Transliteration

Dekhile paree eka-anta-sthaanu | Manaanta mhane nyaave dhuvonu | Paree antar-baahya malee nivatavunu | Naathaa-laagee daakhavoo ||

Ovee 135

ऐसें विचारुनि चित्तांत । पदीं धरिला मीननाथ । खडकावरी आपटोनि त्वरित । गतप्राण पैं केला ॥

Transliteration

Aise vichaaruni chittaatu | Padee dharilaa Meena-Naathu | Khadakaavaree aapatoni tvaritu | Gata-praana pai kelaa ||

Ovee 136

सरिते उदक असे अपार । त्यांत प्रवेशतें झालें रुधिर । तें सर्व अपार जळचर । भक्ष्य म्हणोनि धांवले ॥

Transliteration

Sarite udaka ase apaaru | Tyaata praveshate jhaale rudhiru | Tey sarva apaara jala-charu | Bhakshya mhanoni dhaavale ||

Ovee 137

मच्छ मगरी कबंधदेही । मग तळपती त्या प्रवाहीं । तैं अपार जळचरें पाहूनि डोहीं । मनांत म्हणतसे गोरक्ष ॥

Transliteration

Machcha magaree kabandha-dehee | Maga talapatee tyaa pravaahee | Tai apaara jala-chare pahuni dohee | Manaanta mhanatase Gorakshu ||

Ovee 138

म्हणे जीवें गेला मीननाथ । तरी याचे घालो सदावर्त । एक जीवावरी तृप्त होत । आहेत जीव सकळ हे ॥

Transliteration

Mhane jeeve gelaa Meena-Naathu | Taree yaache ghaalo sadaavartu | Eka jeevaavaree tripta hotu | Aaheta jeeva sakala hey ||

Ovee 139

ऐसा विचार करुनि मनीं । त्वचा घेतली काढूनी । रति रति मांस तुकडे करोनी । जळचरांते ओपीतसे ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni manee | Tvachaa ghetalee kaadhuunee | Rati rati maansa tukade karonee | Jala-charaante opeetase ||

Ovee 140

उरल्या अस्थी त्या जळांत । टाकूनि तेथूनि उठला नाथ । परी त्या जळा नसे अंत । अस्थी तळीं व्यक्त जाहल्याती ॥

Transliteration

Uralyaa asthee tyaa jalaatu | Taakuni tethuni uthalaa Naathu | Paree tyaa jalaa nase antu | Asthee talee vyakta jaahulyaatee ||

Ovee 141

ऐसें करितां गौरनंदन । मांस तें सकळ गेलें आटून । मांस सरल्या आंतडें पूर्ण । जळचतरांतें भक्षविलें ॥

Transliteration

Aise karitaa Gaura-nandanu | Maasa tey sakala gele aatunu | Maasa saralyaa aatade poornu | Jala-charaante bhakshavile ||

Ovee 142

एक त्वचेरहित भाग । कांहीं न ठेवी वरतें अव्यंग । खडकीं पवित्र करुनि चांग । त्वचा घेऊनि चालला ॥

Transliteration

Eka tvache-rahita bhaagu | Kaanhee na thevee varate avyangu | Khadakee pavitra karuni chaangu | Tvachaa gheuni chaalalaa ||

Ovee 143

चालला परी तो सदनीं । तों शिबिरीं नसे मच्छिंद्रमुनी । शांभवीअर्था बाजारभुवनीं । संचरलासे महाराजा ॥

Transliteration

Chaalalaa paree toh sadanee | Shibiree nase Machchindra-munee | Shaambhavee-arthaa baajaara-bhuvanee | Sancharalaase Mahaaraajaa ||

Ovee 144

तों येतांचि येथें गोरक्षनाथ । मग तान्हा पसरी प्रावर्णी त्वचेंत । मित्ररश्मि पाहोनि वात । सुकावया घातलें ॥

Transliteration

Toh yetaanchi tethe Goraksha-Naathu | Maga taanhaa pasaree praavarnee tvachentu | Mitra-rashmi paahoni vaatu | Sukaavayaa ghaatale ||

Ovee 145

तों येरीकडे मच्छिंद्रनंदन । शांभवी आलासे घेऊन । कंदा कुत्का सिद्ध करुन । आसनावरी बैसला ॥

Transliteration

Toh yereekade Machchindra-nandanu | Shaambhavee aalaase gheunu | Kandaa kutkaa siddha karunu | Aasanaa-varee baisalaa ||

Ovee 146

बैसला परी गोरक्षातें । म्हणे बा रे कोठें मीननाथ । येरी म्हणे धुवोनि त्यातें । स्वच्छ आणिलें महाराजा ॥

Transliteration

Baisalaa paree Gorakshaate | Mhane baa re kothe Meena-Naathu | Yeree mhane dhuvoni tyaate | Svachcha aanile Mahaaraajaa ||

Ovee 147

मच्छिंद्र म्हणे आणिलें परी । कोठें ठेविला न दिसे नेत्रीं । येरी म्हणे तान्हा प्रावरीं । सुकूं घातला महाराजा ॥

Transliteration

Machchindra mhane aanile paree | Kothe thevilaa na dise netree | Yeree mhane taanhaa praavaree | Sukoo ghaatalaa Mahaaraajaa ||

Ovee 148

म्हणे मच्छिंद्र काय बोलसी । घातला सुकूं ऐसें म्हणसी । येरी म्हणे कीं असत्य तुम्हांसी । भाषण माझें वाटतसे ॥

Transliteration

Mhane Machchindra kaaya bolasee | Ghaatalaa sukoo aise mhanasee | Yeree mhane kee asatya Tumhaansee | Bhaashana maajhe vaatatase ||

Ovee 149

तरी बाहेर शीघ्र येवोन । स्वचक्षूनें पहावा विलोकून । ऐसें बोलतां मच्छिंद्रनंदन । तेचि क्षणीं बाहेर येतसे ॥

Transliteration

Taree baahera sheeghra yevonu | Sva-chakshuune pahaavaa vilokunu | Aise bolataa Machchindra-nandanu | Techi kshanee baahera yetase ||

Ovee 150

म्हणे कोठें रे मीननाथ । परी पाहतां म्हणे तान्हा प्रावर्णातें । न्याहाळोनि पाहतां त्वचेतें । मग धरणीं आंग सांडीतसे ॥

Transliteration

Mhane kothe re Meena-Naathu | Paree paahataa mhane taanhaa praavarnaate | Nyaahaaloni paahataa tvachete | Maga dharanee aanga saandeetase ||

Ovee 151

म्हणे अहा रे काय केलें । बाळ माझें कैसें मारविलें । अंग धरणीवरी टाकिलें । वरी लोळे गडबडां ॥

Transliteration

Mhane ahaa re kaaya kele | Baala maajhe kaise maaravile | Anga dharanee-varee taakile | Varee lole gadabadaa ||

Ovee 152

अहा अहा म्हणूनी । मृत्तिका उचलोनि घाली वदनीं । आणि वक्षःस्थळा पिटूनी । शोक करी आक्रोशें ॥

Transliteration

Ahaa ahaa mhanuunee | Mrittikaa uchaloni ghaalee vadanee | Aani vakshah-sthalaa pituunee | Shoka karee aakroshe ||

Ovee 153

परम मोहें आरंबळत । उठउठोनि त्वचा कवळीत । हृदयीं लावूनि आठवीत । बाळकाच्या गुणांतें ॥

Transliteration

Parama mohe aarambalatu | Utha-uthoni tvachaa kavaleetu | Hridayee lavuni aathaveetu | Baala-kaa-chyaa gunaante ||

Ovee 154

अहा तुझा मी असें जनक । परम शत्रु होतों एक । जननीचें तोडूनि बाळक । तुज आणिलें कैसें म्यां ॥

Transliteration

Ahaa tujhaa mee ase janaku | Parama shatru hoto eku | Jananee-che toduni baalaku | Tuja aanile kaise myaa ||

Ovee 155

म्हणे अहा रे मीननाथा । मज सांडूनि कैसा गेलासी आतां । एकटा परदेशीं सोडूनि तत्त्वतां । मार्ग मिळाला तुज केवीं ॥

Transliteration

Mhane ahaa re Meena-Naathaa | Maja sanduni kaisaa gelaasee aataa | Ekataa paradeshee soduni tattvataa | Maarga milaalaa tuja kevee ||

Ovee 156

आतां तूतें कीलोतळा । कोठूनि पाहील मुखकमळा । तुझा कापिला गळा । कैसा येथें आणूनी ॥

Transliteration

Aataa toote Keelotalaa | Kothuni paaheela mukha-kamalaa | (Ahaa) Tujhaa kaapilaa galaa | Kaisaa yethe aanuunee ||

Ovee 157

बाळका स्त्रियांचे राज्यांत । भुभुःकारें पावशील मृत्य । म्हणोनि बा रे तुजसी येथें । रक्षणातें आणिलें ॥

Transliteration

Baalakaa striyaanche raajya-antu | Bhubhuh-kaare paavasheela mrityu | Mhanoni baa re tujasee yethe | Rakshanaate aanile ||

Ovee 158

आणिलें परी तुज निश्चितीं । कृतांत झाला गोरक्ष जती । ऐसें म्हणोनि धरणीप्रती । अंग टाकी धडाडून ॥

Transliteration

Aanile paree tuja nishchitee | Kritaanta jhaalaa Goraksha jatee | Aise mhanoni dharanee-pratee | Anga taakee dhadaadunu ||

Ovee 159

पुनः उठे मच्छिंद्रनंदन । त्वचा हृदयीं धरी कवळून । म्हणे बाळा तुजसमान । पुत्र कैंचा मज आतां ॥

Transliteration

Punah uthe Machchindra-nandanu | Tvachaa hridayee dharee kavalunu | Mhane baalaa tuja-samaanu | Putra kainchaa maja aataa ||

Ovee 160

अहा बाळाचें चांगुलपण । मज भासतसे जैसा मदन । अहा बाळाचे उत्तम गुण । कोणा अर्थीं वर्णूं मी ॥

Transliteration

Ahaa baalaache chaangula-panu | Maja bhaasatase jaisaa Madanu | Ahaa baalaache uttama gunu | Konaa arthee varnu mee ||

Ovee 161

बाळा लोटली वर्षें तीन । परी काय सांगूं मंजुळ बोलणें । अहा ताता ऐसें म्हणोन । हांक मारीत होतासी तूं ॥

Transliteration

Baalaa lotalee varshe teenu | Paree kaaya saangoo manjula bolane | Ahaa taataa aise mhanonu | Haanka maareeta hotaasee too ||

Ovee 162

बा रे तनू असतां कोंवळी । परी शयनींहूनि उठसी उषःकाळीं । माथा ठेवूनि मम पदकमळीं । अहो तात ऐसें म्हणसी ॥

Transliteration

Baa re tanoo asataa kovalee | Paree shayaneenhuni uthasee ushah-kaalee | Maathaa thevuni mama pada-kamalee | Aho taata aise mhanasee ||

Ovee 163

बा तूं वसत होतासी मम शेजारी । मर्यादा रक्षीत होतासी अंतरीं । अरे कठिण वागुत्तरीं । शब्द वाहिला नाहीं म्यां ॥

Transliteration

Baa too vasata hotaasee mama shejaaree | Maryaadaa raksheeta hotaasee antaree | Arey kathina vaag-uttaree | Shabda vaahilaa naahee myaa ||

Ovee 164

बा रे भोजन करितां ताटीं । चतुरपणाची परम हातवटी । आपुल्या पुढें ठेवूनि दृष्टी । ग्रास घेसी बाळका ॥

Transliteration

Baa re bhojana karitaa taatee | Chatura-pana-achee parama haa-tava-tee | Aapulyaa pudhe thevuni drishtee | Graasa ghesee baalakaa ||

Ovee 165

अहा रे अहा मीननाथ बाळा । परमज्ञानी वाचा रसाळा । लिप्त कदा नव्हेसी मळा । शुद्ध मुखकमळा मिरविशी ॥

Transliteration

Ahaa re ahaa Meena-Naatha baalaa | Parama-jnyaanee vaachaa rasaalaa | Lipta kadaa navhesee malaa | Shuddha mukha-kamalaa miravishee ||

Ovee 166

अहा बा रे चक्षुघ्राण । कधीं न पाहिलें तुझे मळिण । आजि तुझे अंग विष्ठावेष्टन । कैसें अमंगळ जावया ॥

Transliteration

Ahaa baa re chakshughraanu | Kadhee na paahile tujhe malinu | Aaja tujhe anga vishthaa-veshtanu | Kaise amangala jaavayaa ||

Ovee 167

बा रे कधीं मजवांचून । न राहसी एकांतपण । आजिचे दिनीं शयनीं मज सोडून । कैसा परत गेलासी ॥

Transliteration

Baa re kadhee maja-vaanchunu | Na raahasee eka-anta-panu | Aajiche dinee shayanee maja sodunu | Kaisaa parata gelaasee ||

Ovee 168

बा रे माय तुझी कीलोतळा । तिचा कधीं न पाहसी लळा । आसनीं शयनीं मजपासूनि बाळा । पैल झाला नाहींस तूं ॥

Transliteration

Baa re Maaya tujhee Keelotalaa | Tichaa kadhee na paahasee lalaa | Aasanee shayanee maja-pasuni baalaa | Paila jhaalaa naaheensa too ||

Ovee 169

तरी ऐसें असूनि तुझे मनीं । आजि मज गेलासी सोडूनी । अहा एकदां येऊनि अवनीं । मुख दावीं मज बाळा ॥

Transliteration

Taree aise asuni tujhe manee | Aaji maja gelaasee soduunee | Ahaa ekadaa yeuni avanee | Mukha daavee maja baalaa ||

Ovee 170

ऐसें म्हणोनि मच्छिंद्रनाथ । हंबरडा गायीसमान फोडीत । अहा माझा मीननाथ । कोणी दाखवा म्हणतसे ॥

Transliteration

Aise mhanoni Machchindra-Naathu | Hambaradaa gaayee-samaana phodeetu | Ahaa maajhaa Meena-Naathu | Konee daakhavaa mhanatase ||

Ovee 171

भूमीं लोळे अश्रु नयनीं । नेत्रीं ढाळितां न समाये पाणी । वक्षःस्थळादि पिटूनि अवनीं । दाखवा म्हणे मीननाथ ॥

Transliteration

Bhoomee lole ashru nayanee | Netree dhaalitaa na samaaye paanee | Vakshah-sthalaadi pituni avanee | Daakhavaa mhane Meena-Naathu ||

Ovee 172

ऐसें म्हणोनि आक्रंदत । तें पाहूनि गोरक्षनाथ । मनांत म्हणे अद्यापि भ्रांत । गेली नाहीं श्रीगुरुची ॥

Transliteration

Aise mhanoni aakrandatu | Tey pahuni Goraksha-Naathu | Manaanta mhane adyaapi bhraantu | Gelee naahee Shree-guru-chee ||

Ovee 173

मग पुढें गोरक्षनाथ होऊन । म्हणे महाराजा कां घेतां अज्ञानपण । कोण तुम्ही कोणाचा नंदन । करितां रुदन त्यासाठीं ॥

Transliteration

Maga pudhe Goraksha-Naatha hounu | Mhane Mahaaraajaa kaa ghetaa ajnyaana-panu | Kona Tumhee konaachaa nandanu | Karitaa rudana tyaa-saathee ||

Ovee 174

अहो पुरतें पाहतां कोण मेला । अशाश्वताचा भार हरला । शाश्वत अचळ आहे बोला । कदा काळीं न मरे तो ॥

Transliteration

Aho purate paahataa kona melaa | Ashaashvataachaa bhaara haralaa | Shaashvata achala aahe bolaa | Kadaa kaalee na mare toh ||

Ovee 175

अहो तुमचा मीननाथ । नामधारी असे त्यांत । तो कदा न मरे योजिल्या घात । आहे शाश्वत महाराजा ॥

Transliteration

Aho Tumachaa Meena-Naathu | Naama-dhaaree ase tyaatu | Toh kadaa na mare yojilyaa ghaatu | Aahe shaashvata Mahaaraajaa ||

Ovee 176

तो कदा न मरे शस्त्रघातांनीं । त्यातें न जाळी कदा वन्ही । अनिळ न शोषी ना बुडवी पाणी । शाश्वत चिन्हीं नांदतसे ॥

Transliteration

Toh kadaa na mare shastra-ghaataannee | Tyaate na jaalee kadaa vanhee | Anila na shoshee naa budavee paanee | Shaashvata chinhee naandatase ||

Ovee 177

ऐसें बोलतां गोरक्षक । परी कदा न सोडी शोक । अहा अहा मीननाथ । ऐसें म्हणोनि आक्रंदे ॥

Transliteration

Aise bolataa Gorakshaku | Paree kadaa na sodee shoku | Ahaa ahaa Meena-Naathu | Aise mhanoni aakrande ||

Ovee 178

ऐसिये आग्रहाचा अर्थ । तें पाहूनियां गोरक्षाच्या । मग संजीवनीमंत्राप्रत । स्मरण करितां पै झाला ॥

Transliteration

Aisiye aagrahaachaa arthu | Tey pahuniyaa Gorakshaachyaa | Maga sanjeevanee-mantraa-pratu | Smarana karitaa pai jhaalaa ||

Ovee 179

करी कवळूनि भस्मचिमुटी । संजीवनीमंत्र जपे ओठीं । त्वचेप्रती सोडिता झाला मुष्टी । मीननाथ ऊठला ॥

Transliteration

Karee kavaluni bhasma-chimutee | Sanjeevanee-mantra jape othee | Tvache-pratee soditaa jhaalaa mushtee | Meena-Naatha oothalaa ||

Ovee 180

उठतांचि मीननाथ । मच्छिंद्राचे गळा पडत । मच्छिंद्र पाहूनि हृदयांत । परम मोहें धरीतसे ॥

Transliteration

Uthataanchi Meena-Naathu | Machchindraache galaa padatu | Machchindra pahuni hridaya-antu | Parama mohe dhareetase ||

Ovee 181

चुंबन घेऊनि म्हणे बाळा । कोठें गेला होतासी खेळा । मज टाकूनि विनयस्थळा । गमन केलें होतें कीं ॥

Transliteration

Chumbana gheuni mhane baalaa | Kothe gelaa hotaasee khelaa | Maja taakuni vinaya-sthalaa | Gamana kele hote kee ||

Ovee 182

ऐसें म्हणोनि जैसें तैसें । तोही अस्त पावला दिवस । दुसरे दिनीं मीननाथास । घेऊनि ते चालिले ॥

Transliteration

Aise mhanoni jaise taise | Tohee asta paavalaa divasu | Dusare dinee Meena-naathaasu | Gheuni tey chaalile ||

Ovee 183

मार्गी चालतां त्रिवर्ग जाण । गोरक्ष करितां झाला बोलणें । हे महाराजा मच्छिंद्रनंदन । चित्त द्यावें मम बोला ॥

Transliteration

Maargee chaalataa trivarga jaanu | Goraksha karitaa jhaalaa bolane | Hey Mahaaraajaa Machchindra-nandanu | Chitta dyaave mama bolaa ||

Ovee 184

तुमचा प्रताप पाहतां अवनीं । निर्जीव जीववाल वाटे मनीं । ऐसें असुनि सुतालागुनी । रुदन केलें हे काय ॥

Transliteration

Tumachaa prataapa paahataa avanee | Nirjeeva jeevavaala vaate manee | Aise asuni sutaa-laagunee | Rudana kele hey kaayu ||

Ovee 185

तरी हें रुदन करावया कारण । काय होतें बोला वचन । ऐसें मीननाथ सहस्त्रावधीनें । संजीवनीनें निर्माल ॥

Transliteration

Taree hey rudana karaavayaa kaaranu | Kaaya hote bolaa vachanu | Aise Meena-Naatha sahastraa-vadheene | Sanjeevaneene nirmaalu ||

Ovee 186

तरी हें आश्चर्य वाटे मनीं । स्वामी पडले शोकरुदनीं । कीं चिंताहारक चिंतामणी । तो चिंतेमाजी पडियेला ॥

Transliteration

Taree hey aashcharya vaate manee | Svaamee padale shoka-rudanee | Kee chintaa-haaraka chintaa-manee | Toh chinte-maajee padiyelaa ||

Ovee 187

ऐसें ऐकोनि मच्छिंद्रनाथ । म्हणे तुवां मारिलें किमर्थ । येरु म्हणे मोहभावार्थ । तो पहावया तुमचा ॥

Transliteration

Aise aikoni Machchindra-Naathu | Mhane tuvaa maarile kimarthu | Yeru mhane moha-bhaavaarthu | Toh pahaavayaa Tumachaa ||

Ovee 188

तुम्ही वैराग्यशील म्हणवितां । तरी माया लंघूनि व्हावें परता । आशा मनशा तृष्णा ममता । लिप्त नसावी शरीरातें ॥

Transliteration

Tumhee vairaagya-sheela mhanavitaa | Taree maayaa langhuni vhaave parataa | Aashaa manashaa trishnaa mamataa | Lipta nasaavee shareeraate ||

Ovee 189

ऐशा परीक्षाभावनेसीं । म्यां मारिलें मीननाथासी । परी प्राज्ञिक तुम्ही सर्वज्ञराशी । रुदन कासया केलें जी ॥

Transliteration

Aishaa pareekshaa-bhaavanesee | Myaa maarile Meena-naathaasee | Paree praajnyika Tumhee sarva-jnya-raashee | Rudana kaasayaa kele jee ||

Ovee 190

येरी म्हणे वत्सा ऐक । तूं शिष्य माझा अससी एक । तरी म्यांही परीक्षेचें कौतुक । तुझे बाळा पाहिलें असे ॥

Transliteration

Yeree mhane vatsaa aiku | Too shishya maajhaa asasee eku | Taree myaanhee pareeksheche kautuku | Tujhe baalaa paahile ase ||

Ovee 191

बा रे आशा तृष्णा मनिषा कामना । काम क्रोध मद मत्सर वासना । हे मोहमांदुसी मायासदना । नांदणुकी करितात ॥

Transliteration

Baa re aashaa trishnaa manishaa kaamanaa | Kaama krodha mada matsara vaasanaa | Hey moha-maandusee maayaa-sadanaa | Naandanukee karitaatu ||

Ovee 192

तरी तुझे ठायीं मायालेश । आहे कीं नाहीं महापुरुष । हें पहावया रुदनास । आरंभिलें म्या पाडसा ॥

Transliteration

Taree tujhe thaayee maayaa-leshu | Aahe kee naahee mahaa-purushu | Hey pahaavayaa rudanaasu | Aarambhile myaa paadasaa ||

Ovee 193

आम्ही अलक्षरुपी पाहणें । आणि विज्ञानज्ञानानें विवरणें । याचि कौतुकें जाणपणें । पाहिलें म्यां पाडसा ॥

Transliteration

Aamhee alaksha-rupee paahane | Aani vijnyaana-jnyaanaane vivarane | Yaacha kautuke jaanapane | Paahile myaa paadasaa ||

Ovee 194

बा रे शाश्वत अशाश्वत । तुज कळलें कीं नाहीं होतों या भ्रांतींत । तयाची परीक्षा रुदननिमित्त । तुझी घेतली पाडसा ॥

Transliteration

Baa re shaashvata ashaashvatu | Tuja kalale kee naahee hoto yaa bhraanteentu | Tayaachee pareekshaa rudana-nimittu | Tujhee ghetalee paadasaa ||

Ovee 195

आतां बा रे तुझें वयसपण । समूळ आजि झाले हरण । पयतोयाचेनि कारण । हंसपुरुष मिरविसी ॥

Transliteration

Aataa baa re tujhe vayasapanu | Samoola aaji jhaale haranu | Payatoyaacheni kaaranu | Hansa-purusha miravisee ||

Ovee 196

ऐसें बोलतां गुरुनाथ । गोरक्ष चरणीं माथा ठेवीत । म्हणे महाराजा तुम्ही सनाथ । या देहासी पैं केले ॥

Transliteration

Aise bolataa guru-Naathu | Goraksha charanee maathaa theveetu | Mhane Mahaaraajaa Tumhee sanaathu | Yaa dehaasee pai kele ||

Ovee 197

ऐसें बोलोनि वागुत्तर । पुन्हा गमती मार्गापर । मुक्काममुक्कामीं ज्ञानविचार । गुरुशिष्य करिताती ॥

Transliteration

Aise boloni vaag-uttaru | Punhaa gamatee maargaaparu | Mukkaama-mukkaamee jnyaana-vichaaru | Guru-shishya karitaa-tee ||

Ovee 198

असो यापरी करितां गमन । पुढें कथा येईल वर्तून । नरहरिवंशी धुंडीनंदन । श्रोतियांतें सांगेल ॥

Transliteration

Aso yaaparee karitaa gamanu | Pudhe kathaa yeela vartunu | Narahari-vamshee Dhundee-nandanu | Shrotiyaate saangelu ||

Ovee 199

तरी पुढिले अध्यायीं कथाराशी । पुण्यपर्वत पापनाशी । श्रोते स्वीकारुनि मानसीं । अवधानिया बैसावें ॥

Transliteration

Taree pudhile adhyaayee kathaa-raashee | Punya-parvata paapa-naashee | Shrote sveekaaruni maanasee | Avadhaaniyaa baisaave ||

Ovee 200

तरी नरहरिवंशी धुंडीसुत । तुमचा आहे शरणागत । मालू नाम ठेविलें सत्य । तो कथा सांगेल तुम्हांसीं ॥

Transliteration

Taree Narahari-vamshee Dhundee-sutu | Tumachaa aahe sharana-aagatu | Maaloo naama thevile satyu | Toh kathaa saangela tumhaansee ||

Ovee 201

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । समस्त गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । द्वाविंशतितमाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti shree-bhakti-kathaa-saaru | Samasta Goraksha-kaavya Kimayaa-gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Dvaavimshati-tama-adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu

Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार द्वाविंशतितमाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Dvavimshatitama Sampurnah